जागतिक आदिवासी गौरव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

दैनिक

लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या तेजस्वी क्रांतीकारकांना विनम्र अभिवादन..!

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २८४ वा ▶ बुधवार दि. ९ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ४

न्यूज कॉलम

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आज नाशिक दौऱ्यावर

धुळे । महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार नाना पटोले तसेच प्रदेश महिला काँग्रेसचे अध्यक्ष संध्या सव्वालाखे उद्या नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. जागतिक आदिवासी दिन यानिमित्त शहरातील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून तसेच शिष्टमंडळांशी चर्चा करणार असल्याची माहिती नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड व जिल्हाध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे यांनी दिली.

नरडाणा गावात पशुधनाची चोरी

धुळे । नरडाणा गावात घराबाहेर बांधलेल्या ३२ हजारांच्या पशुधनाची चोरी झाल्याची फिर्याद नरडाणा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अब्दुल रहेमान रसुल तली रा.नरडाणा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्याने त्यांच्या घराबाहेर बांधलेल्या ३२ हजार रूपये किंमतीच्या पशुधनाची चोरी केली. यात १२ हजार रूपये किंमतीचे तीन सुरती बोकड, १४ हजार रूपये किंमतीच्या तीन सुरती बकर्या व सहा हजार रूपये किंमतीचे दोन सुरती पिल्लांचा समावेश आहे. चोरट्यावर गुन्हा दाखल झाला .

गोंडगावच्या घटनेच्या निषेधार्थ शिंदखेड्यात विराट मूकमोर्चा

आरोपीस फाशीच्या शिक्षेची मागणी

शिंदखेडा । प्रतिनिधी

जळगाव जिल्ह्यातील गोंडगाव येथे नऊ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिला जीवे ठार मारल्याची घटना घडली आहे. सदर घटनेचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवा; यासह अन्य मागण्यासाठी विविध संघटनांतर्फे शिंदखेडा येथे मूकमोर्चा काढण्यात आला.

काही दिवसांपूर्वी जळगाव जिल्ह्यातील भडगाव तालूक्यातील बालिकेवर अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यभर उमटत आहेत. याच पार्श्वभूमीवर धुळ्याच्या शिंदखेडा येथे देखील विविध राजकीय योगा सामाजिक संघटनांनी एकत्र येत हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा. तसेच सरकारी वकील उज्वल निकम यांची या खटल्यासाठी नियुक्ती करण्यात येऊन या घटनेत पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी; या मागणीसाठी मूक मोर्चा काढण्यात आला.

शहरातील भगवा चौफुलीपासून मूकमोर्चास प्रारंभ झाला. यावेळी हातात फलक घेवून मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थीनी मोर्च्यात सहभागी झाल्या होत्या. 'चिमुकली कु. कल्याणीला न्याय मिळालाच पाहिजे' अशा आशयाचे फलक तरुणींच्या हातात होते. सदर मोर्चा पुढे छ.शिवाजी महाराज चौफुलीमार्गे तहसील कार्यालयावर धडकला. त्याठिकाणी नायब तहसीलदार शारदा बागले आणि बन्सीलाल वाडिले यांनी मोर्चेकर्यांचे निवेदन स्वीकारले. निवेदनामध्ये सदर खटला जलद न्यायालयात चालावा, कल्याणीच्या मारेकर्यास लोकांसमोर फाशीची शिक्षा द्यावी. तसेच कल्याणीच्या परिवारास मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदतीची मागणी करण्यात आली. हे निवेदन सकल मराठा समाज, सर्व सामाजिक संघटना आणि पक्षांच्यावतीने देण्यात आले. विशेष म्हणजे मोर्च्यास तब्बल २३ संघटनांनी पाठिंबा दर्शविला. आजच्या मोर्च्यात राजकीय नेत्यांसह विविध शाळा, महाविद्यालयांच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला होता. यात तरूणींची संख्या लक्षवेधी होती. यावेळी कु. नेहा कैलास मराठे, जानवी विनायक मराठे, रेणुका उमेश भदाणे, वैष्णवी योगराज पाटील, धनुष्का विनोद पवार, हितल बागुल, निलेश्वरी माळी या तरुणींनी आपले मनोगत व्यक्त करुन घटनेचा जाहीर निषेध केला. तसेच कल्याणीच्या मारेकर्यास कठोर शासन करण्याची एकमुखी मागणी करण्यात आली. दरम्यान, आजच्या मोर्च्यामुळे व्यापार्यांनी आपली दुकाने शंभरटक्के बंद ठेवल्याने शहरात मोठी शांतता पहायला मिळाली.

काळ्या फित लावून घोषणाबाजी

मोर्चामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थिनी व विद्यार्थी सहभागी झाल्याचे बघावयास मिळाले. या मोर्चामध्ये सहभागी झालेल्या सर्व मोर्चेकरांनी काळ्याफिती लावून आपला सहभाग या मोर्चामध्ये नोंदवला असून यावेळी आरोपीच्या विरोधामध्ये तीव्र घोषणाबाजी देखील यावेळी करण्यात आली आहे.

शाहू महाराज नाट्यमंदिरात आज रंगणार

महाराष्ट्राची लोकधारा

परिसंवादासह सांगितिक कार्यक्रम

अ.भा. नाट्य परिषदेतर्फे संयोजन

धुळे । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने 'महाराष्ट्राची लोकधारा शाहिरी परिसंवाद' या कार्यक्रमाचे आयोजन आज बुधवार दि. ९ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. दुपारी १२:३० वाजता धुळे शहरातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज नाट्यमंदिरात हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाचे उदघाटन भारत सरकारच्या खेळ व युवा कार्यक्रम मंत्रालय अंतर्गत कार्यरत असलेल्या नेहरू युवा केंद्र धुळे येथील जिल्हा युवा अधिकारी अशोककुमार मेघवाल यांच्या हस्ते होईल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध नाटककार प्रा. अनिल सोनार सर असतील. या कार्यक्रमाचे संयोजन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य चंद्रशेखर पाटील यांनी केले आहे. कार्यक्रमाची संकल्पना व संहिता प्रा. डॉ. प्रकाश खांडगे, चारुशीला साबळे वाच्छानी यांची आहे. शाहीर निशांत शेख, शाहीर शंकर पिसाळ, नृत्यांगना वर्ष दर्पे, पूजा सावंत, शाहीर विजय कर्जावकर यांच्यासह लोककला क्षेत्रातील ३० मान्यवरांचा यात सहभाग असणार आहे.

या कार्यक्रमासाठी नागरिकांना विनामूल्य प्रवेश देण्यात येणार आहे. त्यासाठीच्या प्रवेशिका शहरातील साक्री रोडवरील पत्रकार भवन, आग्रा रोडवरील बॉम्बे लॉज बिल्डिंगमधील दैनिक लक्ष महाराष्ट्र कार्यालय, देवपुरातील नेहरू चौक येथील स्वामी मेडिकल या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रवेशिकेसाठी पुरुषोत्तम पाटील ७०५७०१११२६, सुभाष शिंदे ९६३७३२६६८०, सुभाष वाघ ९७६३५९९२६२१, तुषार बाफना ८८८८८४७४११ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक चंद्रशेखर पाटील यांनी केले आहे.



कामगार विरोधी धोरणे व विरोधात जुन्या पेन्शनसाठी बाईक रॅली

धुळे । प्रतिनिधी

राज्यातील सर्व जिल्ह्यात कामगार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ व राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी जुनी पेन्शन योजना सामाजिक व आर्थिक सुरक्षितता तत्त्वावर जुन्या पेन्शन योजनेच्या धर्तीवर लागू करण्याचे तत्वता धोरण म्हणून मान्य केले असताना नियुक्त समितीच्या माध्यमातून वेळ काढून पणा केला जात असल्याच्या निषेधार्थ व केंद्र सरकारने पीआर डी ए कायदा रद्द करून देशातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे व कंत्राटी पद्धत बंद करावी खाजगीकरण, उदारीकरण ,जागतिकीकरण चे धोरण राबविणे थांबवावे तसेच किमान वेतन रुपये २६ हजार लागू करावे तसेच सर्वांना रुपये दहा हजार पेन्शन लागू करावी या मागणीकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी धुळे येथे ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९:०० वाजता कल्याण भवन, धुळे येथून जेल रोड येथे बाईक रॅलीचा सकाळी दहा वाजता समारोप होणार आहे.

या बाईक रॅलीच्या यशस्वी नियोजनासाठी दिं ७ ऑगस्ट रोजी कल्याण भवन येथे सरकारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षक संघटना समन्वय समिती तसेच कामगार संघटना संयुक्त समितीची बैठक एस के चौधरी(माध्यमिक शिक्षकांचे जेष्ठ मार्गदर्शक)यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदरहू बैठकीस समन्वय समितीचे निमंत्रक डॉ संजय पाटील, कामगार संघटना संयुक्त समितीचे निमंत्रक एल आर राव, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष अशोक चौधरी चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघाचे एस यु तायडे माध्यमिक शिक्षक संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पवार, डी जे मराठे, आयटक चे पोपट चौधरी, वसंत पाटील, एम एस एम आर ए चे दीपक सोनवणे, सचिन पारोळेकर, ग्रामपंचायत कामगारांचे सुरेश पाटील, बँक युनायटेड फोरमचे संजय गिरासे, एन पी एस कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी कृती समितीचे भूषण पाटील, हर्षल पवार ,संजय पाटील, सुरेश बहाळकर ,महसूल चे सुरेश पाईकराव, तलाठी चे बी एन बिरारी ,न्यायालयाचे सुधीर पोतदार, प्रमोद अहिरराव ,यु एच गिरासे, के यु पवार ,धीरज चव्हाण वन विभागाचे देवेंद्र बच्छाव, जितेंद्र चव्हाण महिला कर्मचारी संघटनेच्या पल्लवी शर्मा, बी ए पाटील प्रा सतीष पाटील आदी पदाधिकारी या बैठकीत सहभागी होते.

राष्ट्रवादी शरद पवार गटाला बसणार आणखी एक धक्का

धुळ्यातील बड्या नेत्याचा राजीनामा?

धुळे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार गट आणि अजित पवार गट असे दोन गट समोर आले. पक्षातील अनेक मोठे नेते अजित पवारांसोबत गेले आहे. आता शरद पवारांच्या राष्ट्रवादी गटाला धुळे जिल्ह्यात लवकरच मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अनिल गोटे लवकरच राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देऊ शकतात.

राष्ट्रवादीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाचा अनिल गोटे यांनी गुरुवारीच पक्षश्रेष्ठींकडे राजीनामा पाठवला आहे. लवकरच अनिल गोटे अजित पवार किंवा शिवसेना उद्धव ठाकरे गटात जाण्याची शक्यता आहे. गोटे हे धुळे शहराचे माजी आमदार आहेत, भाजप पक्षाकडून गोटे हे राजीनामा देऊन गेल्या चार वर्षांपूर्वी ते राष्ट्रवादीत आले होते, तर राष्ट्रवादीपक्षात गोटे यांना प्रदेश उपाध्यक्ष पद देण्यात आले होते,

मोदींच्या यशस्वी कारकिर्दीवर रचलेले शंभर श्लोक कोरलेला ताम्रपट मोदींना अर्पण

खा.गोडसे यांच्या नेतृत्वाखाली त्र्यंबकेश्वरच्या महंतांनी घेतली पंतप्रधानांची भेट

नाशिक । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची संस्कृती आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवल्याने त्र्यंबकेश्वर येथील महंत पिठाधिश्वर स्वामी अनिकेत शास्त्री देशपांडे महाराज आणि साहित्यचार्य यतीशचंद्र मिश्रा यांनी मोदींच्या यशस्वी कारकिर्दीवर शंभर श्लोक लिहिले आहेत. सदर श्लोक ताम्रपटावर कोरून त्यांनी हा पवित्र ताम्रपट काल पंतप्रधान मोदींना अर्पण केला आहे. या ताम्रपटाला मोदी शतकम असे नाव देण्यात आले असून ताम्रपटावर कोरलेले श्लोक पाहून मोदी हे काही काळ भारावून गेले होते. यावेळी खा. गोडसे यांच्या नेतृत्वाखाली महंतांच्या शिष्टमंडळाने मोदींकडे सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशकात संस्कृत विश्वविद्यालय उभारावेत, काशी विश्वनाथच्या धरतीवर त्र्यंबकेश्वर येथे कॉरिडॉर व्हावा तसेच भारतातील सर्व मठ आणि आखाड्यांमध्ये महिलांसाठी साध्वी भवन उभारण्यात यावे आदी आग्रही मागण्या केल्या. खा. गोडसे यांच्या नेतृत्वाखाली काल त्र्यंबकेश्वर येथील महंत पिठाधिश्वर स्वामी अनिकेत शास्त्री देशपांडे यतीशचंद्र मिश्रा, शैलेन्द्र उदावंत, पंकज मिश्रा आदी धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी दिल्लीत जात पंतप्रधानांची भेट घेतली. यावेळी महंत पिठाधिश्वर स्वामी अनिकेत शास्त्री देशपांडे महाराज, साहित्यचार्य यतीशचंद्र मिश्रा यांनी पंतप्रधानांच्या यशस्वी कारकिर्दीवर रचलेले शंभर श्लोक ताम्रपटावर कोरून ताम्रपट मोदींना अर्पण केला. महंत पिठाधिश्वर स्वामी अनिकेत शास्त्री देशपांडे व यतीशचंद्र मिश्रा यांनी लॉकडाऊनच्या काळात वर्षभरात शंभर श्लोक रचलेले आहेत. नाशिकमधील सुजित जोशी, दिपेश देशपांडे आणि मिलिंद फडके या कलाकारांनी दिड महिना अहोरात्र काम करून श्लोक ताम्रपटावर कोरण्याचे काम केले. श्लोक कोरलेला ताम्रपट तीन फुट बाय सव्वा दोन फुट इतक्या आकाराचा आहे.

ताम्रपट अर्पण केल्यानंतर खा. हेमंत गोडसे यांनी सिंहस्थाविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी विशेष चर्चा केली. तीन वर्षांनंतर दर बारा वर्षांनी येणारा सिंहस्थ कुंभमेळा तीन वर्षांनी नाशिक येथे होणार आहे. यासाठीच्या विशेष सोयी सुविधांचे नियोजन आणि त्या संदर्भातील कामांना आतापासूनच प्रारंभ होणे गरजेचे असल्याचे खा. गोडसे यांनी पंतप्रधानांच्या निदर्शनास आणून दिले. काशी विश्वनाथ आणि उज्जैन महांकालेश्वरच्या धर्तीवर धरतीवर त्र्यंबकेश्वर येथे कॉरिडॉर व्हावा, नाशिक येथे संस्कृत विश्वविद्यापिठ उभारण्यात यावे, तसेच भारतातील सर्वच मठ आणि आखाड्यांमध्ये महिला साध्वीसाठी स्वतंत्र साध्वी भवनाची निर्मिती करण्यात यावी, आदी आग्रही मागण्यांचे निवेदन यावेळी महंतांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान मोदी यांना दिले.

आपण केलेल्या मागण्या समर्पक भावनेतून केलेल्या असून लवकरच यावर योग्य असे सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याची ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी खा. गोडसे यांना यावेळी दिली.

मॉक ड्रीलमध्ये दहशवाद्याची ॲक्टिंग करणाऱ्याला नागरिकांनी खरा दहशतवादी समजून दिला चोप

धुळे । प्रतिनिधी

पोलिसांकडून आयोजित करण्यात आलेल्या मॉक ड्रीलमध्ये दहशतवाद्याची भूमिका करणाऱ्या व्यक्तीला नागरिकांनी चांगलाच चोप दिल्याची घटना घडली आहे. धुळे शहरामध्ये हा प्रकार घडला असून या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

अधिक माहितीनुसार, धुळे शहरातील स्वामीनारायण मंदिरात दहशतवादी घुसले असल्याचं तेथील नागरिकांच्या लक्षात आलं. पण हे पाहून तेथील लहान मुले आणि नागरिक घाबरले आणि त्यांनी पोलिसांना ही माहिती दिली. त्यानंतर १० मिनीटांत घटनास्थळी पोलिस दाखल झाले आणि हे मॉकड्रील असल्याचं लक्षात येताच नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. दरम्यान, या घटनेमुळे लहान मुले घाबरल्याने एका नागरिकाने दहशतवाद्याची भूमिका बजावणाऱ्याला चांगलाच चोप दिला. खरा दहशतवादी असल्याचं समजून या नागरिकाने सदर व्यक्तीला मारहाण केली असून पोलिसांनी या घटनेनंतर मारहाण करणाऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतलं आहे. धुळे शहरातील देवपूर भागात असलेल्या श्री स्वामीनारायण मंदिरात दोन बंदूकधारी दहशतवादी शिरले असून त्यांनी चौघा भाविकांना ओलीस ठेवले आहे अशा माहितीचा फोन पोलीस अधीक्षक कार्यालयातील नियंत्रण कक्षात वाजला नियंत्रण कक्षातील अधिकाऱ्यांनी पोलीस यंत्रणेला सतर्क केले काही वेळातच शहरातून सायरन वाजवीत पोलिसांची वाहने मंदिराजवळ पोहोचली. मंदिर परिसरात यावेळी एकच धावपळ उडाली मंदिरात शिरलेल्या दहशतवाद्यांना पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेऊन चौघा भाविकांची सुखरूप सुटका केली. हा सगळा थरार धुळेकर नागरिकांनी काल सायंकाळी अनुभवला. मात्र, हे पोलिसांचे मॉकड्रिल असल्याचे समजल्यावर नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. दहशतवादी हल्ल्याच्या प्रसंगी प्रसंगावधान राखून करावयाच्या प्रमाणित कार्यपद्धतीची ही रंगीत तालीम पोलिसांनी अत्यंत उत्कृष्टपणे यावेळी केल्याचे पाहायला मिळाले, मात्र या सगळ्या थरारा दरम्यान स्वामीनारायण मंदिरात राडा झाल्याचे देखील दिसून आले, यावेळी या सगळ्या थरारात दहशतवाद्याची भूमिका करणाऱ्याला एका नागरिकाने मजबूत चोप दिला, हा प्रकार ज्यावेळी घडला त्यावेळी स्वामीनारायण मंदिराच्या कॅन्टीन परिसरात नागरिक कुटुंबीय समवेत बसले असताना दहशतवादी आत शिरताच त्यांनी केलेल्या बंदुकीच्या फायरिंगच्या आवाजामुळे काही महिला आणि लहान मुले प्रचंड घाबरली होती. यामुळे या संतप्त झालेल्या नागरिकाने दहशतवाद्याची भूमिका करणाऱ्यालाच चोप दिला. या चोप देणाऱ्या नागरिकाला पोलिसांनी लागलीच ताब्यात घेत हे ट्रेनिंगचा एक भाग असल्याचे सांगत ताब्यात घेतले.

लाचखोर तहसीलदाराला पुन्हा दोन दिवसांची पोलिस कोठडी

नाशिक । प्रतिनिधी

गौण खनिज उत्खनन प्रकरणात १५ लाख रुपयांची लाच घेतांना रंगेहाथ पकडण्यात आलेल्या तहसीलदार नरेश बहिरम यास जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती मालकापत्ते रेड्डी यांनी काल पुन्हा दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

राजूर बहुला येथील जमीन मालकास उत्खनन केल्याप्रकरणी १ कोटी २५ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. जमिन मालकाने प्रांत अधिकाऱ्यांकडे अपील दाखल केल्यानंतर फेर चौकशी व स्थळ निरिक्षणासाठी बहिरम यांच्याकडे सदर प्रकरण आले होते. बहिरम याने जमीन मालक व त्यांच्या प्रतिनिधींकडून लाच मागितली व लाच लुचपत अधिकाऱ्यांच्या हातात तो रंगेहाथ सापडला. जिल्हा व सत्र न्यायाधीश उ.जे. मोरे यांनी बहिरम यास आजपर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली काल पुन्हा मलकापत्ते रेड्डी यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. कोर्टाचा मित्र म्हणून झुंजार आव्हाड यांनी बहिरम याच्याविरुद्ध कागदपत्रे दाखल केली. जिल्हा न्यायाधीश रेड्डी यांनी बहिरम यास पुन्हा दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

सामान्यांच्या वेदनांना वाली कोण?

देशातील कनिष्ठ न्यायालयासमोर साडेचार कोटींपेक्षा जास्त खटले प्रलंबित असून त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील खटल्यांची देशात सर्वाधिक आहे. केंद्रीय कायदा मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. त्यात उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयांपुढील प्रलंबित खटल्यांचा समावेश नाही. तथापि त्याही बाबतीत परिस्थिती फारशी वेगळी नसावी. ही आकडेवारी अस्वस्थ करणारी आहे. सद्यस्थितीत साडेचार कोटींपेक्षा जास्त कुटुंबे न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. याचाच दुसरा अर्थ ती कुटुंबे वर्षानुवर्षे आर्थिक आणि मानसिक ताणतणावात जगत असावीत का? न्यायाच्या प्रतीक्षेत हजारो व्यक्तींच्या आयुष्याचा मोठा काळ तुरुंगाच्या गजाआड जातो.

न्याय उशिरा मिळणे म्हणजे न्याय नाकारण्यासारखेच आहे असे म्हंटले जाते. या कुटुंबाना न्याय मिळेल असे गृहीत धरले तरी त्यामुळे कालापव्यय भरून येऊ शकेल का? समस्येला जबाबदार कोण असा प्रश्न नेहमीच विचारला जातो. तुलनेत न्यायालये आणि न्यायाधीशांची संख्या यांचे प्रमाण लोकसंख्येच्या तुलनेत कमीच असल्याचे सांगितले जाते. यासंदर्भात बोलताना एका सरन्यायाधिशांना एका कार्यक्रमात भावनावेग अनावर झाला होता. माध्यमांनी देखील त्याची दखल घेतली होती.

या समस्येवर मात करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेण्याची गरज माजी सरन्यायाधीश रमणा यांनी व्यक्त केली होती. प्रलंबित खटल्यांबद्दल डेटा ग्रीडने अहवाल तयार केला होता. त्यावर माध्यमात वृत्त प्रसिद्ध झाले होते. अनेक खटल्यांमध्ये हजर राहण्यास संबंधित वकिलांना वेळ नसतो. काही खटल्यांमध्ये साक्षीदार तारखांना हजर राहत नाहीत. आरोपी जामिनावर फरार होतात. खटल्यांशी संबंधित दस्तऐवज वेळच्या वेळी कोर्टापुढे दाखले केले जात नाहीत. काही खटल्यांमध्ये साक्षीदारांची संख्या जास्त असते असे काही निष्कर्ष त्यांनी नोंदवले होते. कदाचित त्यामुळेच देखील तारिख पे तारीख चा खेळ रंगत असावा का? महसुली खटल्यांची संख्या देखील जास्त असते. या खटल्यांशी संबंधित मुद्दे सरकारकडून तत्परतेने मांडले जात असावेत का? भरपाईची अनेक प्रकरणे का रेंगाळतात? फौजदारी खटल्यांचा तपास अचूक केला जात असावा का? की तपासात उणीवा राहात असाव्यात का? प्रलंबित खटले निकालात काढायचे तर आवश्यकतेनुसार न्यायालयांच्या वेळांमध्ये लवचिकता आणणं ही काळाची गरज आहे अशी सूचना न्या. लळीत यांनी केली होती. अशा अनेक सूचनांचे आणि मार्गदर्शनाचे पुढे काय झाले? सरकार त्यावर गंभीरपणे विचार करत असावे अशी अपेक्षा. शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये अशी मराठी म्हण आहे. तथापि अनेक लोकांना कोर्टात जाण्याची खुमखुमी असते का? तिला शिकवीन चांगलाच धडा असे म्हणत लोक त्यांच्या छोट्या छोट्या मुद्यांसाठी कोर्टाची पायरी चढत असावेत का? छोटी मोठी भांडणे किंवा तक्रारी समंजसपणे सोडवण्याऐवजी पोलिसात जायची लोकांची तयारी असते. ज्याला शेंडा आणि शेपूटही फारसे नसू शकते अशी प्रकरणे देखील कोर्टात दाखल होतात. हे देखील संख्या वाढण्याचे एक कारण असू शकेल का? कारणे कितीही आणि कोणतीही असली तरी त्याचा ताप सामान्यांनाच होतो. ज्यांची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत त्यांच्या वेदना तेच जाणोत. यात सरकार आणि न्यायसंस्था मार्ग काढेल का?

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न गरजेचे

दरवर्षी देशात ९ ऑगस्ट हा आदिवासी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. खरं तर खऱ्या अर्थाने जंगलचा राजा म्हणून ओळखला जाणारा आदिवासी समाज हा आजही उपेक्षित आहे. या समाजाकडे अजूनही सरकारच्या उपाययोजना पूर्णत: पोहोचलेल्या नाही. आदिवासी समाज हा अजूनही दारिद्र्याच्या सावटाखाली जगत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

खरं म्हटलं, तर आदिवासी समाज हा जंगलचा राजा म्हणून ओळखला जातो. २०११च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ११ कोटी २३ लाख इतकी असून, त्यापैकी आदिवासी जमातींची संख्या १ कोटी ५ लक्ष इतकी आहे. ही राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५% इतकी आहे. महाराष्ट्रात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा) कातकरी मुख्यत: (रायगड व ठाणे) जिल्हा आणि माडिया गोंड (गडचिरोली) जिल्हा या केंद्र शासनाने अधिक जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. राज्यात एकूण ३६ जिल्हे आहेत. आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक व ठाणे (सह्याद्री प्रदेश) चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पूर्वे कडील वनाच्छादित जिल्ह्यांमध्ये मुख्यतः अधिक आहे.

हा समाज प्रामुख्याने जंगली प्रदेशातून पाण्याने भेटलेल्या बेटावर खेडीवाड्यातून संपूर्ण भारतात विखुरलेला आहे. सद्यस्थितीत आदिवासी समस्या हा विषय खूप महत्त्वाचा वाटतो. आदिवासी समाजाच्या समस्या या अतिशय गुंतागुंतीच्या व संकीर्ण आहेत. आजही आदिवासी बांधव अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. आदिवासींच्या आर्थिक क्रियांमध्ये बहुसंख्य लोक अन्न संकलन, शिकार, मासेमारी, बदलती कुऱ्हाड शेती, हस्त व्यवसाय, जंगलातील रानभाज्या याच्यावर आपली उपजीविका भागवतात. आज उपजीविका भागवली उद्याचं उद्या, हीच जीवनशैली. जंगलतोड प्रतिबंध कायदा, वन्य जीवन संरक्षण कायदा यांच्यासारख्या कायद्यांमुळे जळण्यासाठी लाकूड तोडणे, पोटासाठी शिकार करणे यावर मर्यादा आल्यामुळे आपल्याच वाडवडिलांच्या भूमीत जंगलाचे राजे म्हणून ओळखले जाणारे गुन्हेगार ठरू लागले आहेत.

जंगलव्याप्त महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली, मेळघाट, कोकण किनारपट्टीतील आदिवासी समाजात हे जाणवते. त्याचप्रमाणे जंगलव्याप्त नागालँड, मणिपूर, आसाम, अरुणाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड, आंध्र प्रदेश, ओरिसा किनारपट्टीतील आदिवासी समाजात हे जाणवते. वनकर्मचाऱ्यांनी आदिवासी हत्यारे जप्त करून त्यांच्यावर कारवाई करण्याने आदिवासी समाज हा भय व दारिद्र्यात जगत आहे. त्याचप्रमाणे आज एकविसाव्या शतकात भारताने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. या नेत्रदीपक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीने माणसाचे जीवन सुखी, समृद्ध झाले आहे; परंतु गेल्या वर्षी भारताने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. पण आपण आजही म्हणू शकतो. आदिवासी समाज हा मूलभूत गरजांपासून आजही वंचित आहे. त्याचप्रमाणे कुपोषण जर म्हटलं, तर आजही कुपोषणामुळे अनेक बालक दगावत आहे.

आदिवासी समाजात इतर समाजाच्या मानाने कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणावर आढळून येते. आदिवासी समाज प्रगत समाजापासून डोंगर-दऱ्या जंगलाच्या भागात राहत असल्यामुळे त्यांच्यामध्ये संतुलित आहाराविषयी माहिती नसणे, शिवाय आदिवासी समाजातील शैक्षणिक मागासलेपणा, गरिबीमुळे आदिवासींना आपल्या मूलभूत गरजासुद्धा भागवणे कठीण असते. शरीराच्या वाढीसाठी आवश्यक असलेली जीवनसत्त्वे उष्मांक आणि इतर पोषण घटक त्यांना आहारातून घेणे शक्य नसते. त्यामुळे या समाजात कुपोषणाची समस्या निर्माण होते. एकविसाव्या शतकातील प्रगतीच्या काळात कुपोषणाने आदिवासी मुलांचा बळी जावा, ही गोष्ट आपल्या समाजाच्या दृष्टीने लांछनास्पद आहे. आदिवासी भागातील संतुलित आहाराविषयीचे गैरसमज दूर व्हावे. त्याचप्रमाणे गर्भवती स्त्रियांचे अन्नाबद्दल असणारे गैरसमज कुपोषण निर्मूलन अभियानाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले पाहिजे आणि कुपोषण सोडविण्याच्या व्यापक उपायोजना करणे आवश्यक आहे. शिक्षण त्याचप्रमाणे आजही आदिवासी बांधव हा शिक्षणापासून वंचित आहे. दि. ९ ऑगस्टला जागतिक आदिवासी दिन आपण साजरा करत असतो; परंतु आदिवासी बांधव हा जीवन कसे जगत आहे. ते वाड्या-पाड्यांपर्यंत जाऊन पाहिल्याशिवाय समजणार नाही. कोणत्याही मागासलेल्या समाजाची सुधारणा करावयाची असेल, तर त्यासाठी त्या समाजात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. वाचताना अगदी सामान्य वाटणारा हा विचार खरच एक प्रवाह आहे, कारण शिक्षणामुळे कोणत्याही व्यक्तीची दृष्टी व्यापक व विशाल बनते. आपल्या सभोवतांच्या परिसराचे आकलन होते.

आज देशाच्या सर्वोच्च पदावर एक आदिवासी महिला विराजमान झाल्या, त्याची चर्चा गल्लीपासून दिल्लीपर्यंत झाली. पण एखाद्या समाजातील एक व्यक्ती मोठ्या पदावर विराजमान झाली म्हणजे त्या समुदायाची उन्नती प्रगती झाली, असे होऊ शकत नाही.

वर्षानुवर्षे पोटापाण्यासाठी आदिवासी कुटुंबाचे होणारे स्थलांतर हे त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खूप घातक परिणाम करत आहे. वीटभट्टी, कोळसाभट्टी, विटा पाडणे, लाकूडतोडणी, ऊस तोडणी, जेव्हा आदिवासी बांधव आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी स्थलांतरित होतात. मुलांना शिकण्याची इच्छा असूनसुद्धा पण आई-वडिलांच्या उपजीविकेच्या संघर्षात त्यांना शाळा सोडून भटकंती करावी लागते. वर्षानुवर्षे आदिवासी बांधवांचे होणारे मुलांच्या शिक्षणामध्ये अडथळे बनत आहे. त्याचप्रमाणे आर्थिक परिस्थिती आणि भटकंती त्याचप्रमाणे पालकांमध्ये शिक्षणाचे शिक्षणाचे महत्त्व कमी असल्याकारणाने मुलांना पाठ्यपुस्तकात गोडी वाटत नाही.

आदिवासी मुलांना शिकवून पुढे आणायचे असेल, तर प्राथमिक शाळेपासून त्यांची तयारी करावी लागेल. त्यांच्यामध्ये जनजागृती करून त्यांचे मनोधैर्य वाढेल. मानसिकता दुर्बलता कमी होईल. यातून त्यांच्या यशाचा मार्ग मोकळा होईल, अज्ञानाच्या अंधकारात बुडालेले मागासलेपणाच्या भोवऱ्यात सापडलेल्या आदिवासी जनतेपर्यंत ज्ञानाचा प्रकाश पोहोचविण्यासाठी आश्रमशाळांबरोबर महाविद्यालय, तंत्रनिकेतने, व्यावसायिक शिक्षण संकुले, क्रीडा संबोधनी, प्रबोधनी व्यायाम शाळा, व्यवसाय मार्गदर्शन मंच, स्पर्धा केंद्र, इतर शैक्षणिक सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणे गरजेचे आहे. यातून आदिवासींच्या उद्याच्या नवनिर्माण पिढीचे भवितव्य घडेल.

शिक्षण मोफत असूनसुद्धा झाडांची पाने गळतात, तशी शाळेतून लेकरं टपाटपा गळत आहेत, हे चित्र बदलण्यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची गरज आहे. त्याचप्रमाणे इर्शाळवाडीमध्ये डोंगर कोसळून ज्या निष्पाप आदिवासी बांधवांना जीव गमवावा लागला. अशा घटना वारंवार घडत आहेत, अशा घटनांची दखल घेत डोंगर पायथ्याशी असलेल्या आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. मणिपूरमध्ये ज्या आदिवासी महिलांवर अत्याचार झाला, या घटना अतिशय क्लेशदायक आहेत. अशा गुन्हेगारांवर कोठोरात्मक कारवाई होणे आवश्यक आहे. अशा घटना भारत देशात घडू नये यावरही प्रतिबंधात्मक उपाय राज्य आणि केंद्र सरकारने करावे.

- सुनीता सचिन नागरे,
संस्थापक अध्यक्ष, अभिषेक शैक्षणिक व सामाजिक संस्था

प्रवासी पुन्हा वेठीस

मात्र या सवलतीचा फायदा बेस्ट स्वतः न घेता कंत्राटदारांच्या मार्फत घेत आहे त्यामुळे सवलतीचा मिळालेला पैसा हा थेट कंत्राटदाराच्या खिशात जात आहे. यासाठी येत्या काळात पाच हजार ते सहा हजार बसच्या निविदा काढण्यात आल्या असून तीन हजार बसच्या ऑर्डर या आधीच देण्यात आल्या आहेत. म्हणजे येत्या काळात बेस्टच्या ताफ्यात खासगी बस वाढणार हे निश्चितच आहे. मात्र आतापर्यंतचे कंत्राटदारांचे अनुभव बघता बेस्टला या कंत्राटदारांवर किती प्रमाणात अवलंबून राहावे लागणार याचा विचार आत्ताच केला पाहिजे. आताच्या काम बंद आंदोलनादरम्यान उपयोगात आल्या त्या बेस्टच्या स्वमालकीच्या बसगाड्या व स्वतःचे कामगार जे या दिवसात दिवस-रात्र व जादा काम करून प्रवाशांची गैरसोय टाळून बेस्टचा नावलौकिक जपण्याचा प्रयत्न करीत आहेत. पुढे हाही कर्मचारी वर्ग नसेल व कंत्राटदारावरच बेस्ट विसंबून राहणार असेल, तर मात्र पुढे भीतिदायक अवस्था वाढवून ठेवली असेल हे निश्चित.

या कंत्राटदारांनी जे काम बंद आंदोलन सुरू ठेवले आहे ते बरोबर आहे की चूक हे ज्यांनी त्यांनी ठरवावे, कर्मचारी वर्गाच्या दृष्टीने ते बरोबरही असू शकेल. गेली अनेक वर्षे नोकरी करूनही वेतनात वाढ होत नाही. उलट मुंबईतील वाढती रहदारी व कष्टप्रद काम पाहता व बेस्टची ड्युटी पाहता वेतनात सुधार होत नाही व दुसरीकडे इतर वेळेत कामे करता येत नाहीत, त्यामुळे मेटाकुटीला आलेला हा वर्ग

उलट वरिष्ठांकडून आणखी भरडला जातो तेव्हा सक्षम नेतृत्व नसतानासुद्धा आंदोलनात उत्स्फूर्तपणे उतरतो तेव्हा कुठेतरी काहीतरी कमी आहे व आंदोलने हे दखलपात्रच ठरते. या आंदोलनाला सध्या कोणतेही नेतृत्व नाही व दिशाही नाही, बरे प्रत्येक कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांच्या समस्या या वेगवेगळ्या आहेत. प्रत्येक कंत्राटदारांच्या बेस्ट बरोबरचा झालेला करार वेगळा आहे, कर्मचाऱ्यांशी केलेला करार वेगवेगळ्या स्वरूपातील आहे तरी पण आपल्या सर्वांच्या समस्या एकच आहेत व आपण यात भरडले जात आहोत. या भावनेने सर्व कंत्राटदारांचे कर्मचारी एका छताखाली एकत्र आले आहेत. यात बेस्टने हे कर्मचारी आपले नसून आपला यात काही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. उक्त कंत्राटदार व कर्मचाऱ्यांमधील हा संघर्ष आहे तो त्यांनी त्यांच्या पातळीवर सोडवावा अशी भूमिका बेस्टची आहे, बस गाड्या न पुरवल्याबद्दल आपण कंत्राटदारांकडून दंड आकारून आपले नुकसान भरून काढत असल्याचे बेस्टचे म्हणणे आहे. मात्र यात गैरसोय ही बेस्टच्या प्रवाशांची होत आहे. हे बेस्टने विसरून चालणार नाही. शेवटी बेस्टच्या लौकिकाचा प्रश्न आहे हा, या प्रकरणी बेस्टने सदर कंत्राटदाराकडून खुलासा करून घेणे आवश्यक आहे. बरे कंत्राट भरणारा एक आहे. बस पुरवठा करणार एक आहे, कर्मचारी पुरवठा दुसराच करतो आहे. नियोजन करणारा दुसराच आहे. अशी पुरवठादारांची साखळी निर्माण झाली आहे. त्यामुळे बेस्टकडून नियमित वसुली करणारा एक आहे. खालच्या साखळीपर्यंत पोहोचणारा हा दुसराच आहे. त्यामुळे पैशांचे विभाजन होते व शेवटच्या कर्मचाऱ्यांपर्यंत कमी पैसे पोहोचतात व वेतन कमी येते व वरच्या पातळीवर मोठा भ्रष्टाचार होतो. असा आरोप कर्मचारी करत आहे. हा तिढा सुटणे खूपच आवश्यक आहे. त्यासाठी बेस्ट उपक्रम पालकमंत्री, मुख्यमंत्री, कामगार यांनी एकत्र येऊन तोडगा काढावा. कुणीतरी नमते घ्यावे हीच आशा मुंबईकर प्रवासी ठेवून आहेत. कर्मचाऱ्यांनी वेळीच एक पाऊल मागे घेऊन मार्ग काढला नाही तर यांची अवस्थाही एसटी कर्मचाऱ्यांसारखीच होईल. संप चालला सहा महिने मात्र पदरी काय पडले तर शून्य.

शब्दकोडे-१४४



आडवे शब्द

१. समृद्धी ५. बाळाला झोपवताना म्हटले जाणारे लोकगीत ९. एखाद्याच्या आहारी गेलेली व्यक्ती (वाक्प्रचार) ११. बोकड १२. भयंकर १४. सभ्य माणूस १५. दक्षिण भारतातील हा सुपरस्टार मूळ मराठी आहे १६. त्याप्रमाणे २१. आच, उष्णता २२. किरकोळ, नगण्य २४. क्रीडा २५. ढोंग २६. ठीक, बेताचा २७. रस्ता २८. वस्त्र ३०. शुष्कता ३१. धन, वित्त ३२. मुलाची बायको ३४. पाखडण्याचे साधन ३५. नवरी ३७. भरतीची वेळ ३९. गदिमांचे अमर काव्य ४१. जोराचा धपाटा ४२. धेनू ४३. त्वरा ४४. अभिनेता ४५. भस्म ४६. ताकद, एक व्यायामप्रकार ४७. काळजी ४८. व्यर्थ ४९. फजिती ५१. वानवा, चणचण ५२. तांबूल ५४. सोने ५६. कधीच कंटाळा न येणारे ५८. भुईसपाट ५९. राजाची आई ६१. तराजूचे एक पात्र ६२. तमाशा ६४. नम्र ६५. क्षण ६६. लोचट ६८. दसऱ्यापूर्वीचे नऊ दिवस ७१. सध्या ७२. ठाम वृत्तीचा ७३. पूर्वज ७४. स्तुतीचे काव्य ७६. पर्वा, भीड ७७. मित्र ८०. कर्ज काढलेला ८१. पैठणचे थोर संतकवी ८२. समूह ८३. इतर

उभे शब्द

२. ऐकू न येणारा ३. नजर, दृष्टीक्षेप ४. सेपे ५. काजळ ६. थंड ७. टागोरांचे प्रसिद्ध काव्य ८. रौप्य १०. शिष्य ११. थयथयाट १२. कावळा बसायला न् फांदी मोडायला एकच गाठ! १३. वाईट सवय १७. मामंजी १८. अनुज्ञा १९. पायऱ्या असलेली विहीर २०. एक अमली पदार्थ २३. चीर २५. महान २६. दातांची संख्या २९. प्रसंगावधान ३०. टोमणा (ला.) ३३. प्रचंड ३६. अस्पष्ट ३८. पीछेहाट ४०. कन्या ४६. स्त्रियांचा पायातील अलंकार ४७. प्रौढ वयाचा नवरदेव ४८. अनेक बिऱ्हाडे असलेले जुन्या पद्धतीचे घर ५०. ऐकू येण्याचे इंद्रिय ५१. पत्त्यांचा एक खेळ ५२. अग्नी, निखारा ५३. ओंजळ, मुलींचे एक नाव ५५. ललाट ५६. हेकट, हट्टी ५७. टिंगलखोर ५८. भूमी ६०. अपमान ६३. गूढ, खोल ६५. घरामागचे आवार ६७. गृह ६९. चप्पल ७०. त्रासलेला ७५. खून ७६. चक्र ७८. कंड ७९. जंगली

शब्दकोडे १४३ चे उत्तर

आडवे उत्तर - १.अवकाळी ३.मानधन ७.खटला ९.अवस १०.रिकामटेकडा १३.रजतम १५.सुमन १६.फोल १७.वाणी १८.रावण १९.माड २०.वार्ता २१.तलठी २३.हातोहात २४.जहर २५.पालट २६.जामात २८.अंतर २९.लवा ३०.पागा ३१.चरस ३३.पाक ३५.गो ३६.करवत ३८.फलाट ४०.लवाजमा ४१अ. चळत ४३.खीर ४४.तहहयात ४७.वल्गना ४८.टक ५०.थवा ५१.वनसरणी ५४.लहानसहान ५६.चराचर ५८.विमा ५९.भान ६१.रजनी ६२.आकलन ६३.अडीनडीला ६५.रावस ६६.वमन ६८.तमासगीर ६९.कणीदार ७०.कमलाकर ७२.टर ७३.टणत्कार ७४.तोल ७५.वीट

उभे उत्तर - १.अनारसा २.काबूत ३.मावळण ४.नस ५.नरिमन हाऊस ६.फाटे फोडणे ७.खडा ८.लावणी ११.कान १२.कल १४.मराठी १७.वार्ताहर २०.वाजतगाजत २१.तलवार २२.लाट २३.हातचलाखी २५.पालक २६.जागा २७.कृपा ३०.पाताळ ३२.रटरट ३४.कलह ३७.वचनावचनी ३९.खंत ४१.वाया ४२.तडस ४५.हनन ४६.पावा ४७.वनचर ४९.कलमा ५२.नर ५३.रसकस ५५.हातोडी ५७.राजकुमार ५८.विनवणी ६०.नरवर ६२.आवरण ६३.अनार ६४.लावालावी ६५.रागीट ६७.मदार ६८.तट ६९.कर ७०.कल ७१.कट

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

ट्रकच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

नाशिक । नाशिक-पुणे महामार्गावर असलेल्या बिटको कॉलेज जवळील गुरुद्वारासमोर रस्ता क्रॉस करणाऱ्या एका वृद्धाला ट्रकची धडक बसल्याने झालेल्या अपघातात सदरचा वृद्ध ठार झाला असून याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्ह्याचे नोंद सुरू होती. नाशिक-पुणे महामार्गावरील बिटको चौक ते द्वारका या रस्त्यावर सातत्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. आज सुद्धा या रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहतुकीच्या कोंडीमुळे रस्ता ओलांडणाऱ्या नागरिकांना सुद्धा त्रास होत असल्याचे दिसून आले. या दरम्यान बिटको कॉलेजजवळ असलेल्या गुरुद्वारासमोर पंडित शंकर पगारे (७३) हे वृद्ध रस्ता ओलांडत असताना नाशिकरोडहून नाशिककडे जाणाऱ्या एका ट्रकची पगारे यांना धडक बसल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर ते या अपघातात ठार झाले. अपघात झाल्याचे समजताच वाहतुकीच्या कोंडीत आणखी मोठी भर पडलेली दिसत होती. त्यामुळे रस्त्यावरही वाहनांच्या दोन्ही बाजूने मोठ्या रांगा लागलेल्या होत्या.

राज्य सरकारकडून 'मायटेक्सपो २०२३' ट्रेड फेअरच्या यशस्वीतेसाठी सर्वतोपरी सहकार्य- ना. दादा भुसे

उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी मायटेक्सपो ट्रेड फेअर ठरणार महत्वपूर्ण – ललित गांधी

नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री एंड ग्रीकल्चरतर्फे उत्तर महाराष्ट्राच्या समृद्ध व सर्वांगीण विकासासाठी व्यापार, उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग चालना देण्यासाठी मायटेक्सपो २०२३ ट्रेड फेअर येत्या दि. ६ ते ९ ऑक्टोबर दरम्यान डोंगरे वस्तीगृह, गंगापूररोड, नाशिक येथे आयोजित करण्यात येत आहे. उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगाला राज्य व देश, जागतिक पातळीवर प्रोत्साहन देण्याचे काम होणार असून या माध्यमातून नवीन व्यापार उद्योगांच्या संधी प्राप्त होणार आहेत. उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी मायटेक्सपो २०२३ हे ट्रेड फेअर महत्वपूर्ण ठरणार आहे. दरम्यान राज्य सरकारकडून मायटेक्सपो २०२३ या ट्रेड फेअरच्या यशस्वीतेसाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असे आश्वासन पालकमंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी दिले.

ट्रेड फेअर मध्ये विविध १५ हून अधिक क्षेत्रातील ३०० स्टॉल असतील. व्यापारी उद्योजकांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. तसेच मायटेक्सपो या ट्रेड फेअरच्या माहिती पत्रकाच्या अनावरण प्रसंगी ५० स्टॉल बुक झाले असून प्रतिसाद चांगला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी नाशिकमध्ये होणाऱ्या मायटेक्सपो या ट्रेड फेअरच्या निमित्ताने उत्तर महाराष्ट्रात चांगली गुंतवणूक येवून नवीन प्रकल्प तयार होतील, उत्तर महाराष्ट्राच्या व्यापार उद्योगाला गती व चालना मिळेल, राज्याच्या विकासात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची भूमिका नेहमीच अग्रेसर राहीली आहे. मायटेक्सपो या ट्रेड फेअरच्या माध्यमातून राज्यासह देशातील व्यापारी-उद्योजक नाशिकमध्ये येऊन व्यापार उद्योग करतील. त्यातून उत्तर महाराष्ट्राचा व्यापार उद्योग समृद्ध होईल असे पालकमंत्री दादा भुसे यांनी सांगितले. राज्य सरकारकडून या ट्रेड फेअरच्या यशस्वीतेसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

उत्तर महाराष्ट्र विभागाच्या व्यापार, उद्योगाला प्रोत्साहन व चालना देण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री एंड ग्रीकल्चरतर्फे आंतरराष्ट्रीय मायटेक्सपो या ट्रेड फेअरचे आयोजन नाशिकमध्ये डोंगरे वस्तीगृह मैदान येथे करण्यात येत आहे. मायटेक्सपो ट्रेड फेअरच्या माहितीपत्रकाचे अनावरण नाशिकचे पालकमंत्री व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते व कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थित झाले. याप्रसंगी व्यासपीठावर वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, प्रदर्शनाचे कन्व्हेनर व्हिनस वाणी, को- कन्व्हेनर सचिन शहा, मिलिंद राजपूत, निमा अध्यक्ष धनंजय बेळे उपस्थितीत होते. या एक्सपोमध्ये व्यापार, उद्योग, कृषी, उद्योग, बांधकाम, आयटी, शिक्षण ऑटोमोबाईल, गृहप्रकल्प, सोलार यासह विविध १५ हून अधिक क्षेत्रातील ३०० स्टॉल या प्रदर्शनात असणार आहेत.

दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी मोनिका गोडबोले- यशोद सन्मानित

नाशिक । प्रतिनिधी

लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सतर्फे विशेष बालकांना प्रशिक्षण देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या कार्याबद्दल मोनिका गोडबोले - यशोद यांना सन्मानित करण्यात आले आहे. नुकतेच प्रमाणपत्र, सन्मानचन्ह व पदक त्यांना प्रदान करण्यात आले. पाठोपाठ एमटीटीव्ही न्यूज मीडिया संस्थेने त्यांच्या विशेष मुलांच्या विकासात देत असलेल्या योगदानाची दखल घेऊन पुरस्कार बहाल केला.

विशेष बालके अधिक संवेदनशील आणि मनस्वी असतात. त्यांच्यावर चिकाटीने उपचार करून प्रशिक्षण द्यावे लागते. त्यांना सर्वसामन्यांप्रमाणे मुख्य प्रवाहात आणणे हे जिकिरीचे व कौशल्याचे काम असते. रायझिंग चाईल्ड डेव्हलपमेंट अँड लर्निंग सेंटरमध्ये अशा बालकांना व त्यांच्या पालकांना विशेष प्रशिक्षण दिले जाते. देशभरातून तसेच परदेशातून येथे येणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

प्रशिक्षक मोनिका गोडबोले - यशोद म्हणाल्या, या पुरस्कारांनी आमच्या कार्यावर आंतरराष्ट्रीय मान्यतेची मोहर उमटली आहे. काही मुलांमध्ये जन्मत:च अनेक समस्या असतात. पालकांनी त्या लवकर ओळखून व स्वीकारून त्यावर तातडीने योग्य इलाज करणे आवश्यक असते. मी व माझे सहकारी अशा प्रत्येक मुलाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे प्रशिक्षण देतो. ओमकार साधना, गायत्री मंत्र उच्चार यांचा स्मरणशक्ती, शारीरिक व बुध्यांक वाढ यासाठी निश्चित उपयोग होतो. आम्ही देत असलेले प्रशिक्षण, मूल व पालक या तिन्ही घटकांच्या एकत्रित प्रामाणिक प्रयत्नातून या विशेष बालकांच्या प्रगतीचा आलेख उंचावतो असेही त्यांनी नमूद केले.

जात पडताळणी प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यासाठी आवश्यक सोयी-सुविधा पुरविणार : डॉ. विजयकुमार गावित

नाशिक । प्रतिनिधी

राज्यातील अनुसूचित जमाती जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेली जात पडताळणीची प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यासाठी आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा आदिवासी विभागामार्फत पुरविण्यात येतील, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले. आज महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा) नाशिक येथे आयोजित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अधिकाऱ्यांसाठी आयोजित एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मंत्री डॉ.गावित बोलत होते.

यावेळी कार्यशाळेस आदिवासी विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, लोकायुक्त गोवा अंबादास जोशी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणेच्या सहसंचालिका चंचल पाटील, उच्च न्यायालय संभाजी नगरचे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता प्रवीण पाटील, उच्च न्यायालय संभाजी नगरचे सिनियर कौन्सील व माजी सहाय्यक महाअभियोक्ता ड संजय देशपांडे यांच्यासह आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अधिनस्त कार्यरत राज्यातील १५ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सहआयुक्त, उपआयुक्त, संशोधन अधिकारी, विधी समन्वयक, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरिक्षक आणि तपासणी समिती कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

मंत्री डॉ.विजयकुमार गावित यावेळी म्हणाले, या कार्यशाळेत जात पडताळणी समिती अधिकारी यांना पडताळणी कामात वारंवार येणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने कायद्यातील आवश्यक बदल याबाबत सविस्तर चर्चा व सोबतच तज्ज्ञांद्वारे मागदर्शनही करण्यात येणार आहे. येणाऱ्या काळात या सर्व केसेस व त्यांचे निकाल ऑनलाईन करून समित्यांचे ऑनलाईन लिंकींग सुद्धा करण्यात येणार आहे. त्यामुळे जात पडताळणी केसेस व त्यांच्या निकालांच्या संदर्भांचा उपयोग इतर समित्यांना होऊन कामात होणारा विलंब कमी होण्यास मदत होणार आहे. यासाठी अत्याधुनिक साधन-सामुग्री व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यास आदिवासी विकास विभाग कटीबद्ध असल्याचे मंत्री डॉ. गावित यांनी यावेळी सांगितले

लोकायुक्त गोवा अंबादास जोशी आपल्या मनोगतात म्हणाले, आपले काम ही विकसनशिल यंत्रणा आहे. आपण आपल्या दैनंदिन कामाचे सखोल चिंतन व अभ्यास केला तरच आपण स्वत:ला न्याय देवू शकणार आहात. कार्यशाळेत उपस्थित समिती अधिकाऱ्यांनी अभिव्यक्त होणे गरजेचे आहे तरच ही कार्यशाळा यशस्वी होणार असल्याचे श्री. जोशी यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणेच्या सहसंचालिका चंचल पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्थेतील मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांचा आढावा विषद करून संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

राष्ट्र उभारणीच्या कार्यात वसंत व्याख्यानमालेचे महत्वपूर्ण योगदान

शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांचे गौरवोद्गार

नाशिक । प्रतिनिधी

शताब्दी वर्ष साजरे करणाऱ्या नाशिक वसंत व्याख्यानमालेने राष्ट्र उभारणीच्या कार्यात महत्वपूर्ण आणि अविस्मरणीय योगदान दिले आहे असे गौरवोद्गार सोलापूर येथील शिवव्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांनी काढले.

माहे मे महिन्यातील वसंत व्याख्यानमालेच्या शताब्दी वर्षात जगभरातील व्याख्याते आमंत्रित करून व्याख्यानमालेचे स्वरूप लोकल ते ग्लोबल असे केल्याबद्दल गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या वतीने मालेच्या विद्यमान कार्यकारी मंडळाचा सन्मान शेटे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेखक तुमच्या भेटीला या उपक्रमाचे आयोजक वसंत खैरनार होते.

भारतामध्ये व्याख्यानमाला अनेक आहेत. परंतु संपूर्ण मे महिनाभर चालणारी नाशिकची वसंत व्याख्यानमाला ही एकमेव संस्था आहे. महात्मा गांधींपासून सावरकरांपर्यंत विविध क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्वांनी या व्याख्यानमालेत आपले तेजस्वी विचार मांडले आहेत. या विचारांतून प्रेरणा घेऊन अनेक व्यक्तिमत्त्व घडली आहेत. नैराश्याने घेरलेल्या काही व्यक्तिमत्वांना येथील विचारांतून सावरण्याचे बळ मिळाले आहे. नवनवीन विचारांतून देशात नवीन संकल्पना उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे राष्ट्र उभारणीच्या कामात व्याख्यानमालेचे महत्वपूर्ण आणि अविस्मरणीय असे योगदान आहे असे डॉ. शेटे आपल्या भाषणात म्हणाले.

आज समाजातील संवाद हरवत चालला आहे. त्यामुळेच नितीन देसाई सारखा दिग्गज कलादिग्दर्शकावर आत्महत्येची वेळ आली आहे. त्यांनी समाजापुढे, आपल्या हितचिंतकांकडे असलेल्या अडचणींबाबत मन मोकळे केले असते तर निश्चितपणे मार्ग निघाला असता आणि या कलादिग्दर्शकाला आपण वाचवू शकलो असतो. या पार्श्वभूमीवर कुटुंबामध्ये मनमोकळा संवाद ठेवा आणि आपल्या मुलांवर आपले विचार लादण्याऐवजी त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांना त्यांचे कामाचे क्षेत्र निवडू द्या असे आवाहन यावेळी डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले.

यावेळी व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी, उपाध्यक्ष विजय हाके, उषा तांबे, कार्याध्यक्ष प्रा. संगिता बाफणा, कार्योपाध्यक्ष मनीष सानप, चिटणीस हेमंत देवरे, सहचिटणीस गणेश भोरे, हेमंत तुपे, खजिनदार अविनाश वाळुंजे, कार्यकारी मंडळ सदस्य कांतीलाल तातेड, विजय काकड, कृष्णा शहाणे, अंतर्गत हिशेब तपासनीस सुनील गायकवाड यांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

उपस्थितांचे स्वागत प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. प्रास्ताविक डॉ. शंकर बोऱ्हाडे यांनी केले. सन्मान पत्राचे वाचन मोहिनी भगरे यांनी केले. पाहुण्यांचा सत्कार गिरणा गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार, अश्विनी बोरस्ते यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन भाग्यश्री चौधरी यांनी केले. कार्यक्रमास विविध सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी व विविध क्षेत्रातील महनीय व्यक्ती उपस्थित होते.

प्रोसेस जमा — ॲड. दिपराज एम पाटील
निशाणी नं.६

जाहिर नोटीस

साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे न्यायालयात

दिवाणी कि. अर्ज क्र. १८२ / २०२३

श्रीमती अंजीराबाई पुंडलिक बेडसे वै. उ. व. ६२ धंदा-घरकाम रा. छडवेल (कोर्डे), ता. साक्री जि. धुळे .....**अर्जदार**

विरूध्द

कोणीही .....**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दिनांक २३/ ०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. पुंडलिक वेडु बेडसे यांचे दिनांक १३/०४/२०११ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) श्रीमती अंजीराबाई पुंडलिक बेडसे
२) श्री. दिपक पुंडलिक बेडसे
३) श्री. रत्नाकर पुंडलिक बेडसे
४) ग. भा. दिपीका भिकन बेडसे
५) चि . तन्मय भिकन बेडसे (अ.पा. क)
६) कु. जिज्ञासा भिकन बेडसे (अ.पा. क)

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्या अर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात दिनांक २/९/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात यईल.

सदर जाहिर नोटीस नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीत दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :- २१/०७/२०२३

व.लिपिक — शिक्का — सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री — दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री

ॲड.योगेश जाधव
निशाणी नं.६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. ४थे सह दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज. नं. ९७८/२०२३

नितीन कृष्णराव महाजन
रा.३४ विवेकानंद कॉलनी गोंदुररोड धुळे. .....**अर्जदार**

विरूध्द

कै. शितल नितीन महाजन ... **सामनेवाला**

ज्या अर्थी अर्जदार यांनी वर नमुद मयताचे कायेदशिर वारस या नात्याने शासकीय, निमशासकीय व महसूल कार्यालय यांचेकडील व त्याअनुशंगाने कामकाजासाठी व मयताच्या वारसासंबंधीच्या आवश्यक बाबींच्या पुर्ततेसाठी अर्जदारांचे नावाने हेअरशिप सर्टिफिकेट मिळावे म्हणुन अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी वर नमुद केलेल्यानुसार मयतांच्या वारसाबाबत हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदार यांचे नावे देण्यास कोणाचीही कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी दि. २०/०९/२०२३ रोजी १० वाजता वर निर्दिष्ट केलेल्या कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून मांडाव्यात अन्यथा अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

आदेशावरून

कामगिरी कारकुन — शिक्का — अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर धुळे — दिवाणी न्यायालय व स्तर धुळे

ॲड. निखिलकुमार रविंद्र वडनेरे, धुळे
निशाणी नं.६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. ६ वे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर सो. यांचे न्यायालयात.

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९५३/२०२३

श्री. राजीव मोहनलाल अग्रवाल वै .....**अर्जदार**

विरूध्द

कै. पुनम राजीव अग्रवाल (मयत) .....**मयत**

ज्याअर्थी की, अर्जदार नं. १ श्री. राजीव मोहनलाल अग्रवाल हे कै. पुनम राजीव अग्रवाल यांचे पती आहे तर अर्जदार नं. २ स्नेहा राजीव अग्रवाल हया कै.पुनम राजीव अग्रवाल यांची मुलगी आहे तर अर्जदार नं. ३ हर्षल राजीव अग्रवाल हया कै. पुनम राजीव अग्रवाल यांची मुलगी आहे. कै. पुनम राजीव अग्रवाल हया कायमस्वरूपीचे धुळे येथील रहिवासी आहे व त्यांचे उपचार घेत असतांना दि. २७/६/२०२३ रोजी मौजे मुंबई पश्चिम येथे निधन झालेले आहे. अर्जदार यांना शासकिय कामांसाठी वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. ०५/०९/२०२३ रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर
धुळे
दिनांक - ०४/०८/२०२३ — शिक्का — आदेशावरुन

व.लिपिक — अधिक्षक
फौजदारी न्यायालय साक्री — दि.न्या.व.स्तर, धुळे

ॲड.देवराम डी. बागुल धुळे
निशाणी नं.६

जाहिर नोटीस

धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो व. स्तर यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज. क्र. ९७१/२०२३

१. धम्मपाल विजय पगारे उ. वय. :-२२ वर्ष, धंदा :- मजुरी,
२. सुनंदा विजय पगारे उ. वय :- ५३ वर्ष, धंदा :- घरकाम,
३. श्रुती विजय पगारे उ. वय :- २४ वर्ष, धंदा :- घरकाम
सर्व रा. कैलास नगर, संभाप्पा कॉलनीच्या मागे, चितोड रोड, धुळे .....**अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ... **सामनेवाला**

आणि

कै. विजय भुरा पगारे (मयत) मृत्यु दिनांक ०१/०२/२०२१, मृत्यु ठिकाण - कैलास नगर, संभाप्पा कॉलनीच्या मागे, चितोड रोड, धुळे .....**मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. ४/८/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. न.९७१/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी कै. विजय भुरा पगारे (मयत) यांच्या नावे मौजे धुळे, ता. जि. धुळे येथील नगर भूमापन क्रमांक व उपविभाग नं. ६१२, प्लॉट नं. १८०, एकुण क्षेत्र ५२.०० चौ. मी. धारणाधिकार 'क' या मिळकतीस अर्जदार नं. १ ते ३ हे कायदेशीर वारस असल्याने त्यांना नाव लावणेसाठी तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.११/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं.६, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस सकाळी ठिक १०:०० वाजता उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक ०७/०८/२०२३ — शिक्का — आदेशावरून

कामगिरी कारकुन — अधिक्षक
मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. — मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

न्यूज कॉलम

ट्रकची बसला धडक; चालकसह दोन प्रवासी जखमी

साक्री । ओव्हरटेकच्या नादात भरधाव वेगाने येणाऱ्या बसने ट्रकला समोरासमोर धडक दिल्याने घडलेल्या अपघातात बस चालकासह दोन प्रवासी व ट्रकचा क्लीनर जखमी झाल्याची घटना शिवाजीनगर फाट्याजवळ घडली आहे. याबाबत ट्रक चालक प्रकाश मोहन नेरकर याने निजामपूर पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, तो त्याच्या ताब्यातील एमएच ४१ एजी ५२५२ हा ट्रक घेऊन येत असतांना समोरुन भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच १३ सीयू ६७३१ या क्रमांकाच्या नंदुरबारपुणे बसने पुढे चालणाऱ्या बैलगाडीस ओव्हरटेक करुन ट्रकला समोरासमोर धडक दिली.

दारुच्या अति सेवनाने इसमाचा मृत्यू

धुळे । मोहाडी उपनगरातील विठ्ठल मंदिराजवळ जयशंकर कॉलनीत राहणारे शिवाजी मोतीराम पाटील (सोनवणे) (वय ४०) यांना दारूचे व्यसन होते. अति दारू सेवनामुळे त्यांचा उपचार घेताना मृत्यू झाला. शिवाजी सोनवणे हे रिक्षाचालक आहेत. त्यांना दारूचे व्यसन होते. अशातच अति दारु सेवन झाल्याने त्यांची तब्येत बिघडली. त्यांना तातडीने हिरे वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरु असताना त्यांचा मृत्यू झाला. मोहाडी पोलिसात नोंद घेण्यात आली.

शेतकरी सहकारी संघाच्या निवडणुकीत बळीराजा विकास पॅनलचा दणदणीत विजय

साक्री । प्रतिनिधी

येथील शेतकरी सहकारी संघाच्या निवडणुकीत युवानेते हर्षवर्धन दहिते यांच्या नेतृत्वात बळीराजा विकास पॅनलने १४ पैकी ९ जागा जांगावर दणदणीत विजय मिळवला. तर सर्वपक्षीय नेत्यांच्या शेतकरी विकास पॅनलला केवळ ५ जागांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे साक्री नगरपंचायत, कृषी उत्पन्न बाजार समिती पाठोपाठ आता शेतकरी सहकारी संघावर हर्षवर्धन दहितेंचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. विजयानंतर उमेदवारांसह समर्थकांनी हर्षवर्धन दहितेंना खांद्यावर घेत गुलालाची उधळण करत आनंदोत्सव साजरा केला. तर शेतकी संघांचे दिवंगत सभापती विलास बिरारीस यांच्या प्रतिमेसमोर कृतज्ञता व्यक्त केली.

साक्री शेतकरी सहकारी संघाची निवडणूक गेल्या २० वर्षांपासून सातत्याने बिनविरोध होत होती. यंदा प्रथमच दोन पॅनल आमने सामने रिंगणात असल्याने निवडणूक चुरशीची ठरली. युवा नेते तथा जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती हर्षवर्धन दहिते यांच्या नेतृत्वात ' बळीराजा विकास पॅनल तर सर्वपक्षीय नेत्यांच्या नेतृत्वात ' शेतकरी विकास पॅनल निवडणुकीच्या मैदानात होते. या निवडणुकीत दोन्ही पॅनलच्या नेत्यांनी संपूर्ण ताकद पणाला लावली होती. त्यामुळे या निवडणुकीकडे संपूर्ण साक्री तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले होते. अखेर युवानेते हर्षवर्धन दहिते हे सर्वांना पुरुन उरल्याचे या निकालातून दिसून आले.

साक्री नगरपंचायत , साक्री कृषी उत्पन्न बाजार समिती पाठोपाठ त्यांनी शेतकरी सहकारी संघावर एकहाती सत्ता मिळवली आहे. त्यामुळे तालुक्यात त्यांचा पुन्हा एकदा करिष्मा दिसून आला. शेतकरी सहकारी संघाच्या निवडणुकीसाठी काल ७८.५८ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर आज सकाळी राजे लॉन्स येथे ८ वाजेपासून मतमोजणीला सुरवात झाली. निकाल ऐकण्यासाठी उमेदारांसह समर्थकांनी मोठी गर्दी केली. विजयी उमेदवारांच्या नावाची घोषणा होताच समर्थकांमधून जोरदार जल्लोष करण्यात येत होता. विजयी उमेदवारांच्या अभिनंदनाचे मॅसेजही सोशल मीडियावर झळकत होते.

या निवडणुकीत शेतकरी सहकारी संघाचे माजी चेअरमन स्व.विलासआबा बिरारीस यांच्या प्रेरणेने व शिवाजीराव दहिते यांच्या मार्गदर्शनखाली बळीराजा विकास पॅनल रिंगणात होते. या पॅनलच्या विजयासाठी माजी खा.बापुसाहेब चौरे, माजी आमदार डी.एस.अहिरे, युवानेते हर्षवर्धन दहिते, विशाल देसले आदी नेत्यांनी जंग पछाडले होते. परिणामी, पॅनलचे १४ पैकी ९ उमेदवार दणदणीत मतांनी विजयी झाले . विजयानंतर हर्षवर्धन दहितेंच्या नेतृत्वात शहरात मिरवणूक काढून आनंदोत्सव साजरा करण्यात आला . यावेळी स्व . विलासआबा बिरारीस यांच्या निवास्थानी जाऊन हर्षवर्धन दहितेंसह विजयी उमेदवारांनी स्व . आबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन हा विजय त्यांना समर्पित केला.

शेतकरी विकास पॅनलला केवळ ५ जागा मिळावीता आल्या. या पॅनल चे नेतृत्व आ.सौ.मंजुळताई गावित, ज्येष्ठ नेते सुरेश पाटील, सुरेश सोनवणे, उत्तमराव देसले, चंद्रजित पाटील, तुळशीराम गावीत, पोपटराव सोनवणे, अशोक ठाकरे, सतिष देसले, पंकज मराठे, वेडूआण्णा सोनवणे, शैलेश आजगे, खंडू पोसल्या कुवर, रमेश अहिरराव, गोकुळ परदेशी, अजय सोनवणे, मोतीराम कुवर, वसंतराव घरटे, जितेंद्र मराठे, सुमित नागरे, विजय भामरे, सुजन सोनवणे , साहेबराव गांगुर्डे , विजय भामरे , जितेंद्र बिरारीस , सचिन बेडसे , प्रदीप सोनवणे , मानसिंग गिरासे , महेंद्रसिंग गिरासे आदी नेत्यांच्या पुढाकारातून शेतकरी विकास पॅनल रिंगणात होते. या पॅनलला केवळ पाच जागांवर विजय मिळवता आला. त्यात सर्वसाधारण गटाच्या तीन जागा तर अनुसूचित जाती - जमातीच्या दोन जागांचा समावेश आहे. निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी मनोज चौधरी , विजय भडांगे , अमोल वेंडाईत, राजेंद्र वीरकर, सय्यद मुस्ताक, संजय वेंडाईत यांनी कामकाज पाहीले. तर पोलीस निरीक्षक मोतीराम निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. रौंदळ, पाहेका संजय शिरसाठ, शांतीलाल पाटील आदींनी चोख बंदोबस्त ठेवला .

विजयी उमेदवार

सर्वसाधारण गट- अनिल दयाराम शिंदे (१८९८ मते), दिनेश यादवराव सोनवणे (१७८३), शिरीष आनंदराव सोनवणे (१८९१).
महिला राखीव - संध्या अरुण अकलाडे (२१८४) , विमलबाई गोरखराव अहिरराव (१९२९).
संस्था सभासद प्रदीपकुमार किशोर नांद्रे (६४) , उमाकांत लक्ष्मण पाटील- बिरारीस (६५) , सजन नथ्थू पाटील (५२). अनिसूचित जाती - विजय साहेबराव बागुल (२०६८).
शेतकरी विकास पॅनलचे विजयी उमेदवार सर्वसाधारण गट- उल्केश उत्तमराव देसले (१९५९), विलास गुलाबराव देसले (१७७१), ऍड. नरेंद्र उत्तमराव मराठे (१९४०).
इतर मागासवर्ग- नयनेश भिमराव भामरे (२०२५) . भटक्या विमुक्त जाती डॉ.माणिक धोंडू मारनर (२०१६)

गावोगावी कृषीमाल प्रक्रिया उद्योग सुरु होणे गरजेचे- ॲड.नितीन ठाकरे

नाशिक । प्रतिनिधी

निसर्गाचा लहरीपणा तसेच ग्लोबल वॉर्मिंग अशा संकटांमुळे आज शेतकरी खूप मोठ्या अडचणीत सापडला आहे. पिकविण्याची बुध्दी त्याच्याकडे आहे. पण, विकण्याचे ज्ञान मात्र नाही. म्हणूनच ग्रामीण भागात कृषिमाल प्रक्रिया उद्योग सुरू होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर मधमाशी पालन व्यवसाय हा पर्यटन उद्योगाला चालना देऊ शकतो, हे पिंपळगाव येथील बसवंत मधमाशी प्रशिक्षण केंद्राने सिध्द केले आहे, असे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस नितीन ठाकरे यांनी केले.

पिंपळगाव बसवंत येथील ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि. संचलित बसवंत कृषी उद्योग पर्यटन केंद्राच्या वतीने दि. १ ते १० ऑगस्ट दरम्यान आयोजित राज्यस्तरीय प्राचार्य, मुख्याध्यापक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्राचार्या डॉ. दीप्ती देशपांडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी त्या म्हणाल्या की, शेतीपूरक पर्यावरण निर्माण करून आणि निसर्गाशी मैत्री करून त्याचे संवर्धन कसे करता येईल याचे छान प्रात्यक्षिक बसवंत मधमाशी प्रशिक्षण केंद्राद्वारे विविध उपक्रमांतून दाखवले जात आहे.

यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. प्रमोद रसाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. बी.बी.पवार, डॉ. भास्कर गायकवाड, कल्पेश गोसावी, प्रदीप देशपांडे आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

रूढ शालेय शिक्षणाची धुरा वाहणार्या प्राचार्य, मुख्याध्यापकांच्या सहभागातून हे कार्य अधिक व्यापक आणि विद्यार्थिकेंद्री करण्याचे उद्दिष्ट या परिषदेच्या आयोजनामागे आहे. असे पूर्वा केमटेक प्रा.लि. चे कार्यकारी संचालक संजय पवार यांनी प्रास्ताविक करताना सांगितले.

याप्रसंगी ग्रीनझोन ग्रोकेमचे तांत्रिक संचालक डॉ. भास्कर गायकवाड, विजय पवार, महेश पाटील, संदीप वाघ तसेच संदीप सोनवणे, नितीन कराळे आदींसह राज्यभरातील अनेक प्राचार्य, मुख्याध्यापक उपस्थित होते. डॉ. गायकवाड यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन सायली लभडे यांनी केले.

शासनातर्फे अन्नदिनानिमित्त रेशन दुकान नं. ४४ येथे शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्यवाटप

धुळे । प्रतिनिधी

शासनातर्फे अन्नदिनानिमित्त सोमवार दि. ७ जुलै रोजी मोफत धान्यवाटप करण्यात आले. शहरातील साक्री रोडवरील स्वामी पद्मनाभ नगर येथे रेशन दुकान क्रमांक ४४ मध्ये हा मोफत धान्यवाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नगरसेवक सुनील बैसाणे, बन्सी जाधव, माजी नगरसेविका कशीश उधासी, वंदना बागुल, रेशन दुकानदार चालक मालक संघर्ष व समन्वय समितीचे उपाध्यक्ष तथा रेशन दुकान क्रमांक ४४ चे चालक राजेश ओहाळ, अमर ओहाळ या मान्यवरांच्या हस्ते लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वाटप करण्यात आले, यात प्राधान्य कुटुंब लाभार्थीस २ किलो गहू ३ किलो तांदूळ व अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना १५ किलो गहू, २० किलो तांदूळ व १ किलो साखर याप्रमाणे वाटप करण्यात आले. कुणीही पात्र लाभार्थी धान्य वाटपापासून वंचित राहणार नाही अशा पध्दतीने धान्यवाटपाचे नियोजन करुन वाटप करण्यात येत असल्याचे राजेश ओहाळ यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.

कोकण नागरी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

सातपूर । येथील कोकण नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन चंद्रकांत पाटकर यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

या सभेत विषय पत्रिकेप्रमाणे आर्थिक पत्रकाचे वाचन, इतिवृत्त वाचन, लेखापरिक्षण अहवाल वाचन, संस्थेच्या सन २०२२-२३ या मागील सालातील वार्षिक अहवाल वाचन, सभासदांना १२ टक्के लाभांश वाटप देण्याच्या निर्णयासह अनेक महत्वपूर्ण निर्णयाचे उपस्थित सभासदांनी स्वागत केले.

उंटावद येथे कृषी दुतांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

शिरपूर । प्रतिनिधी

स्व. वि. संस्थेचे विकासरत्न सरकार साहेब रावल कृषी महाविद्यालय, दोंडाईचा ग्रामीण जागरुक्ता कार्यानुभव कार्यकरमाअंतर्गत अंतीम वर्षाचे विद्यार्थी शिरपूर तालुक्यातील उंटावद गावात दाखल झाले असून येथील शेकतऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

कृषीदुत योगेश पाटील, रोहन राऊत, सतिश साबळे, दर्शन सैद, प्रसाद सैंदाणे,अनिकेत साळुंके,धीरज शिंदे हे विद्यार्थी गावात राहणार असून शेतकऱ्यानंसाठी विविध कार्यक्रमांचे प्रात्यक्षिकंसह आयोजन करणार आहेत. यात शेतजमिनीचे माती व पाणी परीक्षण विविध पिकांची लागवड , तंत्रज्ञानाचा वापर, पिकांवर येणारे रोग, त्या संबंधित माहिती व त्यांचे निवारण आदी विषयांवर मार्गदर्शन करतील. त्यांच्या समवेत गावाचे प्रथम नागरिक सरपंच शरद कुंवर, उपसरपंच राजकपूर मराठे, ग्रामविकास अधिकारी देवरेसाहेब, पोलीस पाटील राजेंद्र सातकर तसेच गावातील पंचक्रोशीतील नागरिकांची भेट घेऊन या कार्यानुभव कार्यक्रमाचे उद्दीष्ट व त्यासंबंधित ग्रामस्थांशी चर्चा केली. महाविद्यालयाचे प्रा डॉ. विवेक चव्हाण, प्रा डॉ. इंद्रजित गिरासे व प्रा.शरद भोपळे यांचे याकामी मार्गदर्शन लाभले आहे.

निजामपूर येथे मिशन इंद्रधनुष्याचे आयोजन

जैताणे । प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य केंद्र जैताणे अंतर्गत उपकेंद्र निजामपूर येथे दि ०७ ते १२ ऑगस्ट मिशन इंद्रधनुष्य राबविण्यात येणार आहे.

निजामपूर गावाचे जेष्ठ नागरिक उपसरपंच श्याम पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर हितेंद्र गायकवाड यांच्या सूचनेनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र जैताणे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ आकाश गावित यांच्या मार्गदर्शनाखाली मिशन इंद्रधनुष्य मोहीम राबवण्यात आली. आरोग्य कर्मचारी के वाय शिंदे, आरोग्य सहाय्यक सी जे सोनवणे, आरोग्य सेवक एस बी चव्हाण, आरोग्य सेविका गटप्रवर्तक रत्ना जाधव, डाटा एन्ट्री ऑपरेटर निलेश आढावे व आशा कार्यकर्त्या उपस्थित होते.

विवाहितेचा छळ; तिघांविरूद्ध गुन्हा

धुळे । घर घेण्यासाठी माहेरून ५० लाख आणावेत म्हणून सौद मकबुल चौधरी, सजरूमिया मकबुल चौधरी व मकबुल हनिफ चौधरी (रा. मलाड पश्चिम) यांनी शारीरिक व मानसिक छळ करून जीवे मारण्याची धमकी दिली, अशी फिर्याद आयशा सौद चौधरी हिने दिली. त्यावरून चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

अण्णाभाऊ साठे यांना शिवसेनेतर्फे अभिवादन

नाशिक । प्रतिनिधी

साहित्यरत्न शिवशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०३ वी जयंती निमित्ताने नाशिक शिवसेना महनगराच्या वतीने एनडी पटेल रोड, बीडी भालेकर हायस्कूल जवळील पुतळ्यास हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी पालकमंत्री दादाजी भुसे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रविण तिदमे, मामा ठाकरे, उप जिल्हाप्रमुख दिगंबर मोगरे, शिवजी भोर, प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, भिवानंद काळे, दिलीप अहिरे, सनी रोकडे, रोशन शिंदे, दीपक मौले, अंबादास जाधव, रुपेश पालकर, दिगंबर नाडे, श्रीकांत मगर, नाना काळे, उमेश चव्हाण, सुधाकर जाधव, कल्पेश कांडेकर, आनंद फरतळे, आकाश पवार, अरुण घुगे आदी उपस्थित होते.

तसेच आण्णाभाऊ साठे जयंतीचे स्वागत समितीचे अध्यक्ष बाळासाहेब आठवले तसेच नाशिक मधील कलावंतानी पालकमंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन आपल्या समाजाच्या समस्या व मागण्या मांडल्या.

विद्याधन महाविद्यालयात नॅक मूल्यांकन संपन्न

धुळे । प्रतिनिधी

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या विद्याधन महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१७ ते २०२३ या ५ वर्षाच्या मुल्यांकन करण्यासाठी नॅक समिती बंगलोर कडे अहवाल सुपुर्त केला होता. त्यात प्रामुख्याने महविद्यायाचे दैनंदिन कामकाज, शैक्षणिक शिबिरे, राष्ट्रीय सेवायोजना, विद्यार्थी विकास विभाग, शैक्षणिक सहली, प्राध्यापकांच्या विविध समिती तयार करुन केलेला बृहत आराखडाप्रमाणे कामकाज, परिक्षेत विद्यार्थ्यांनी धारण केलेली गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी व सर्वांगीण विकास व्हावा म्हणून आयोजित केलेली तज्ञांची व सामाजिक उन्नतीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या मान्यवरांची व्याख्याने आयोजित केलेली होती.

कला गुणांना वाव मिळावा म्हणून कलात्मक अशा स्पर्धांचे आयोजन केल्याचे संघटन, प्राध्यापकांचा सेमिनार व चर्चा सत्रामध्ये सहभाग, नोकरी विषयी मार्गदर्शन व सल्लागार समिती मार्फत झालेली व्याख्याने, विविध कंपनीचे प्रतिनिधी बोलवून नोकरीच्या वाटा यावर व्याख्याने, माजी विद्यार्थी यांना निमंत्रित करुन त्यांना महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच महाविद्यालयातील शैक्षणिक बाबींमध्ये बदलाव घडवून आणण्यासाठी सहभाग मोलाचा ठरतो आहे. स्पर्धा परिक्षेसाठी स्वतंत्र पुस्तक बँकच्या स्वरुपात उपलब्ध असतात. त्या विभागात डॉ. बोरसे हे नव-नविन तंत्रज्ञान विकसित करत असतात. महाविद्यालयाच्या परिसरात स्वतंत्र असे वनऔषधी उद्यान आहे. त्यात १०० पेक्षा जास्त वनस्पती, वनऔषधी व दैनंदिन उपयोगात लावण्यात आल्या आहेत. त्यातून सेंद्रीय खत निर्मिती करुन, वनस्पती उद्यान फुलविण्यात मदत होते. समाज प्रबोधन व्हावे म्हणून पालक मेळावे व त्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात येते. वरील सर्व माहिती, नॅक मूल्यांकनासाठी पाठविण्यात आली त्या समितीची पाहणी करण्यासाठी म्हैसूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. सय्यद अकील अहमद, डॉ. राजीव बारडोलाय, प्राचार्य. महिला विद्यालय तीनसुकीय असाम, दिल्ली येथील इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाचे डॉ. राजीव शुक्ला यांनी महाविद्यालयाचे कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करुन नॅक मुल्यांकनासाठी अहवाल सादर केला. त्या आहवालाची पडताळणी करुन प्रथमताच महाविद्यालयाला 'बी' श्रेणी प्राप्त झाली. त्याचा गुणवत्ता क्रमांक २.३८ एवढा प्राप्त झाला. हा दर्जा प्राप्त करणारे विद्यापीठा अंतर्गत कायम विनाअनुदानित तत्वावरील पहिले महाविद्यालया आहे. सदर अभिनंदन संस्थेच्या अध्यक्षा शारदा पाटील, उपाध्यक्षक प्रा. के. बी. पाटील, सचिव हर्षल पाटील, संचालिक पुजा शिंदे पाटील, प्रा. जागृती पाटील प्राचार्य डॉ. आर. बी. पावर, नॅक समन्वयक डॉ. यु. जी. पाटील डॉ. रविंद्र धिवरे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. बोरसे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. ललिता निकम, प्रा सोनाली मोरे, प्रा, अमित उंबरे, प्रा, नेहा अग्रवाल, प्रा. वैशाली चौधरी. प्रा कोमल देवरे. प्रा. सागर पाटील प्रा. पल्लवी सुर्वे. प्रा. रुपाली पाटील, प्रा, गायत्री नवासारे, प्रा. वसुधा आहिरे, आदी केली.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344

प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नोकरी महोत्सवास तरुणांचा प्रचंड प्रतिसाद

नाशिक। नाशिक जिल्ह्यात उद्योगांचा अधिक विकास करून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करत जिल्ह्यातील तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळवून देण्यासाठी आपला प्रयत्न असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच राज्यशासनाच्या माध्यमातून बेरोजगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी भवन नाशिक येथे भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन मंत्री छगन भुजबळ व राज्य विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी आयोजित कार्यक्रम ते बोलत होते. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, माजी खासदार देविदास पिंगळे, आ. दिलीप बनकर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, जिल्हाध्यक्ष ड.रवींद्र पगार, प्रदेश पदाधिकारी दिलीप खैरे, नानासाहेब महाले, बाळासाहेब कर्डक, अर्जुन टिळे, निवृत्ती अरिंगळे, जिल्हा कार्याध्यक्ष गोरख बोडके, विष्णूपंत म्हैसधूने, डॉ.शेफाली भुजबळ, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष समाधान जेजुरकर, महिला जिल्हाध्यक्षा प्रेरणा बलकवडे, महिला शहराध्यक्ष योगिता आहेर, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, कविताताई कर्डक, गौरव गोवर्धने, संजय खैरनार, मनोहर कोरडे, शंकर मोकळ, जीवन रायते, बाळासाहेब गीते, चेतन कासव, योगेश निसाळ, संतोष भुजबळ, आकाश कदम, चिन्मय गाढे, नागेश गवळी, प्रसाद सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

चिमुरडीच्या न्यायासाठी लेकी उतरल्या रस्त्यावर

शिंदखेडा । जळगाव जिल्ह्यातील गोंडगाव येथे नऊ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिला जीवे ठार मारल्याची घटना घडली आहे. सदर घटनेचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवा; यासह अन्य मागण्यासाठी विविध संघटनांतर्फे शिंदखेडा येथे मूकमोर्चा काढण्यात आला. काही दिवसांपूर्वी जळगाव जिल्ह्यातील भडगाव तालूक्यातील बालिकेवर अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यभर उमटत आहेत. याच पार्श्वभूमीवर धुळ्याच्या शिंदखेडा येथे देखील विविध राजकीय योगा सामाजिक संघटनांनी एकत्र येत हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा. तसेच सरकारी वकील उज्वल निकम यांची या खटल्यासाठी नियुक्ती करण्यात येऊन या घटनेत पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी; या मागणीसाठी मूक मोर्चा काढण्यात आला. शहरातील भगवा चौफुलीपासून मूकमोर्चास प्रारंभ झाला. यावेळी हातात फलक घेवून मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थीनी मोर्च्यात सहभागी झाल्या होत्या. 'चिमुकली कु. कल्याणीला न्याय मिळालाच पाहिजे' अशा आशयाचे फलक तरुणींच्या हातात होते. सदर मोर्चा पुढे छ.शिवाजी महाराज चौफुलीमार्गे तहसील कार्यालयावर धडकला. त्याठिकाणी नायब तहसीलदार शारदा बागले आणि बन्सीलाल वाडिले यांनी मोर्चेकर्यांचे निवेदन स्वीकारले. निवेदनामध्ये सदर खटला जलद न्यायालयात चालावा, कल्याणीच्या मारेकर्यास लोकांसमोर फाशीची शिक्षा द्यावी. तसेच कल्याणीच्या परिवारास मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदतीची मागणी करण्यात आली. हे निवेदन सकल मराठा समाज, सर्व सामाजिक संघटना आणि पक्षांच्यावतीने देण्यात आले. विशेष म्हणजे मोर्च्यास तब्बल २३ संघटनांनी पाठिंबा दर्शविला. आजच्या मोर्च्यात राजकीय नेत्यांसह विविध शाळा, महाविद्यालयांच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला होता.

संकलन : दिपक वाघ